# साहित्योत्सवासाठी सज्ज ‘मटा मैफल’

म. टा. प्रतिनिधी, पुणे

LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रस्तुत
मटा मैफल
Powered By
BookGanga.com
Creation | Publication | Distribution

आजचे तरुण काय वाचतात आणि काय लिहितात, साहित्याचा उत्सव करावा काय, आजच्या मराठी साहित्यावर ख्यातनाम समीक्षकांना काय वाटते, हे साहित्य ‘खपाऊ’ नाही काय, बालसाहित्याकडे कसे पाहिले जाते... मराठी साहित्याबाबत महत्त्वाच्या असलेल्या या प्रश्नांवर चर्चा होणार आहे, ती ‘महाराष्ट्र टाइम्स’च्या मैफलीत! येत्या शनिवारी आणि रविवारी (१७ आणि १८ जानेवारी) बीएमसीसी रस्त्यावरील गोखले इन्स्टिट्यूट येथे ही मैफल रंगणार असून, ती सर्वांसाठी खुली आहे.

पुणे आवृत्तीच्या वर्धापनदिनानिमित्त ‘मटा’ने आयोजिलेल्या या साहित्यविषयक उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. ख्यातनाम लेखक-समीक्षकांपासून नवोदित लेखक-कवींपर्यंत अनेक मान्यवर या मैफलीत रंग भरणार आहेत. पाच चर्चासत्रे, दोन अभिवाचन, गझल कार्यशाळा, मान्यवरांबरोबरच नवोदितांनाही संधी देणारा कवीकट्टा आणि विविध प्रकाशकांची पुस्तके... अशा भरगच्च कार्यक्रमांनी ही मैफल सजणार आहे. या मैफलीत रंग भरण्यासाठी, साहित्याचा आस्वाद घेण्यासाठी तुम्हा सर्वांना निमंत्रण आहे. शनिवारी आणि रविवारी दुपारनंतर गोखले इन्स्टिट्यूटमध्ये या, मान्यवर साहित्यिक, समीक्षकांचे विचार ऐका, तरुण लेखकांच्या भावना जाणून घ्या अन् काव्यरंगात रंगून जा!

➤➤ सविस्तर कार्यक्रमपत्रिका...२

## कवीकट्ट्याला उदंड प्रतिसाद

मान्यवर कवींबरोबर कविता सादर करण्याच्या आवाहनाला वाचकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. ‘मटा मैफली’त सादर करावयाच्या कवितांची निवड परीक्षकांकडून केली जात असून, त्याची माहिती संबंधित कवींना कळविली जाणार आहे.

## तरुणांचा सहभाग आणि मुलेही

पहिल्याच पुस्तकाद्वारे चर्चेत असलेल्या तरुण लेखकांचे सत्र मैफलीत रंगणार आहे. श्रुती आवटे, मंदार करंजकर, दाक्षायणी आठल्ये, प्रमोद बोराडे, अनिश परदेशी आदी त्यात सहभागी होणार आहेत. या शिवाय बालसाहित्याबाबतच्या खास सत्रात मुलांसाठी गोष्टीही सांगितल्या जाणार आहेत.

# मान्यवरांच्या उपस्थितीत रंगणार 'मटा मैफल'

**पुणे :** प्रा. द. भि. कुलकर्णी, डॉ. सदानंद मोरे, ह. मो. मराठे, भानू काळे, अश्विनी धोंगडे, राजन खान, मनोहर सोनवणे, प्रा. मनोहर जाधव, संजय भास्कर जोशी, प्रा. रेखा इनामदार साने, संजीवनी बोकील, प्रा. मिलिंद जोशी, डॉ. प्रदीप आवटे, प्रदीप निफाडकर आदी मान्यवर 'महाराष्ट्र टाइम्स'ची मैफल रंगविणार आहेत. येत्या शनिवारी आणि रविवारी (१७ आणि १८ जानेवारी) बीएमसीसी रस्त्यावर गोखले इन्स्टिट्यूट येथे ही मैफल रंगणार असून, ती सर्वांसाठी खुली आहे.

**'मटा मैफल'मधील कार्यक्रमांचा तपशील पुढीलप्रमाणे -**

**शनिवार, १७ जानेवारी २०१५**

**सत्र पहिले :** दुपारी ३ ते ४:४५, स्थळ - काळे सभागृह, आम्ही काय वाचतो, का लिहितो?

**सहभाग :** तरुण लेखक-वाचक : मंदार कारंजकर, दाक्षायणी आठल्ये, अनिश परदेशी, श्रुती आवटे, प्रमोद बोराडे.

**सत्र दुसरे :** सायंकाळी ५ ते ६:३०, स्थळ - काळे सभागृह, साहित्याचा उत्सव आणि सर्जनशीलता

**सहभाग :** डॉ. सदानंद मोरे, ह. मो. मराठे, राजन खान.

**सत्र तिसरे :** दुपारी ४:३० ते सायंकाळी ६:३०-ज्ञानवृक्ष, बालसाहित्य आणि आपण

**सहभाग :** स्वाती राजे, मिलिंद परांजपे, चंद्रमोहन कुलकर्णी.

**सत्र चौथे :** सायंकाळी ६:४५ ते ८:४५, स्थळ- ज्ञानवृक्ष, रारंगढांग या कादंबरीचे अभिवाचन-गिरीश परदेशी.

**रविवार, १८ जानेवारी २०१५**

**सत्र पहिले :** वेळ - दुपारी ३ ते ४:४५, स्थळ - काळे हॉल, आमच्या नजरेतून आजचे मराठी साहित्य

**सहभाग :** प्रा. द. भि. कुलकर्णी, भानू काळे, संजय भास्कर जोशी, रेखा इनामदार साने.

**सत्र दुसरे :** वेळ - सायं. ५ ते ६:४५ स्थळ - काळे हॉल, मराठी साहित्य 'खपाऊ' नाही काय?

**सहभाग :** प्रदीप चंपानेरकर, देवयानी अभ्यंकर, सुप्रिया लिमये, प्रा. मिलिंद जोशी, रमेश राठिवडेकर.

**कविकट्टा :** दुपारी ३ ते ४ आणि ५ ते ७ स्थळ – ज्ञानवृक्ष, प्रमुख सहभागी कवी - अश्विनी धोंगडे, मनोहर सोनवणे, मनोहर जाधव, अंजली कुलकर्णी, संजीवनी बोकील, आश्लेषा महाजन, ममता सपकाळ, उद्धव कानडे, इत्यादी. गजल कार्यशाळा - दुपारी ४ ते ५ स्थळ – ज्ञानवृक्ष.

बेट्टी मेहमुदीच्या 'नॉट विदाउट माय डॉटर' पुस्तकातील प्रकरणांचे अभिवाचन- अंकिता गुणपुले आणि सहकारी, सायंकाळी ७ ते ७:३० स्थळ - काळे हॉल.

LIC प्रस्तुत मटा मैफल
BookGanga.com
Creation | Publication | Distribution